# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १९/०७/२००३

आज दि. १९/०७/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सुचना क्र.४ दि.११/७/२००३ रोजीच्या विषय पत्रिकेवर विचार विनीमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंडोसा मायरा गिल्बर्ट | महापौर |
| २) | श्री. सय्यद मुझफ्फर हुसेन | उपमहापौर |
| ३) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती |
| ४) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्ष नेता |
| ६) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ७) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | गटनेता |
| ८) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| ९) | श्री. पाटील अशोक बळवंत | गटनेता |
| १०) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ११) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १२) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १३) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १४) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १५) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १६) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १७) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १८) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १९) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २०) | श्रीम. गोहिल शानू | सदस्या |
| २१) | श्री. मदन उदितनारायण सिंग | सदस्य |
| २२) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| २३) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २४) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २५) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २६) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| २७) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २८) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २९) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३०) | श्रीम. सावळे निर्मला बाबुराव | सदस्या |
| ३१) | श्री. माळी रविंद्र भिमदेव | सदस्य |
| ३२) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३३) | श्रीम. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३४) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३५) | श्री. आत्माराम बाळाराम गावंड | सदस्य |
| ३६) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ३७) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३८) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३९) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ४०) | श्री. पटेल आसिफ गुलाम | सदस्य |
| ४१) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ४२) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |
| ४३) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | गटनेता |
| ४४) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४५) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४६) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४७) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४८) | श्री. मेंडोसा स्टीवन जॉन | सदस्य |
| ४९) | श्री. पाटील रोहीदास आत्माराम | सदस्य |
| ५०) | श्री. कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ५१) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५२) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ५३) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सदस्या |
| ५४) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ५५) | श्री. घोन्सालविस जोजफ जॉन | सदस्य |
| ५६) | श्री. जेम्स इजिदोर कोलासो | सदस्य |
| ५७) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५८) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५९) | श्री. मॉरस जोजेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ६०) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ६१) | श्रीम. शहा रिटा सुभाष | सदस्या |
| ६२) | श्री. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ६३) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ६४) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६५) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६६) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६७) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ६८) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्य |
| ६९) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ७०) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ७१) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ७२) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ७३) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७४) | श्रीम. रक्षा एस. शाह | सदस्या |
| ७५) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ७६) | श्री. ठाकुर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७९) | श्री. संजय नारायण पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ८०) | श्री. परेरा टेरी पॉल | नामनिर्देशित सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा | सदस्या |
| २) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३) | श्री. मिलन गोंविंदराव पाटील | सदस्य |

## रजेचे अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा.महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, मा. उपमहापौर, विरोधी पक्षनेते, उपस्थित सर्व सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी वर्ग, पत्रकार बंधू आणि नागरीक आपले सर्वांचे स्वागत.

हिरवे डोंगर, निळे सागर, पांढरे मिठागर, हरित सुंदर करु मिरा भाईंदर. पर्यावरण दिन व वनमहोत्सवानिमित्त मिरा भाईंदर शहरात वृक्ष दिंडी व वृक्षारोपणासारखे कार्यक्रमांना आपण तसेच मिरा भाईंदर रहिवाशांनी चांगल्या प्रकारे सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांची आभारी आहे.

मा. स्थायी समितीच्या निवृत्त झालेल्या सदस्यांनी मिरा भाईंदरच्या विकासास हातभार लावून चांगले सहकार्य केलेले आहे. तरी त्या सर्वांना आपल्या सर्वांच्या वतीने धन्यवाद देते. तसेच नव्याने नियुक्ती होणाऱ्या आठ सदस्यांचे निवडीकरीता शुभेच्छा.

मिरा भाईंदर शहरातील इयत्ता दहावी शालांत परिक्षेत पास झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन तसेच मा. आयुक्त यांनी मागील महासभेत ठरविल्याप्रमाणे विशेष प्राविण्य मिळवून पास झालेल्या विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्याचे कार्यक्रम आयोजित करण्यांत यावे. तरी आपण सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी. प्र. सचिव साहेबांनी पुढील सभेचे कामकाज सुरु करावे.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, मा. महापौरांनी सभेच्या अगोदर सुचना केली आहे की, सर्व सन्मा. सदस्यांनी आपले मोबाईल सभागृह चालू असतांना बंद ठेवावेत. शहर विकास आघाडी यांच्याकडून पत्र आलेले आहे, श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर यांची शहर विकास आघाडीचे गटनेता म्हणून निवड करावी असे त्यांनी दिले आहे. तरी मा. महापौरांच्या परवानगीने ते मी जाहीर करीत आहे. आजच्या सभेतील सभा सुचना क्र. ४ याद्वारे कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि. १९/०७/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात तिसरा माळा सभागृह महासभा सुचना क्र. ४ दि. ११/०७/२००३ रोजीच्या सोबतच्या विषय पत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सर्व सन्मा. सदस्यांनी सभेत उपस्थित रहावे. प्रश्नोत्तराच्या तासास सुरुवात होत आहे. ११.४० मिनिटांनी सुरुवात होत आहे आणि अर्धा तास म्हणजेच १२.१० वाजता प्रश्नोत्तर तास संपेल. प्रश्न क्र. २ सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी विचारलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम एक धन्यवाद प्रस्ताव मी मांडू इच्छितो. आपण परवानगी दिल्यास, नगरपालिकेच्या वेळी एक प्रस्ताव भाईंदरच्या सर्व रस्त्यांचे नामकरण करावे असा प्रस्ताव त्यावेळी स्थायी समितीपुढे आला होता. स्थायी समितीनंतर महासभेमध्ये तो प्रस्ताव आला आणि महासभेमध्ये तत्कालीन सर्व नगरसेवकांनी एकमताने तो प्रस्ताव रस्त्यांचे नामकरण व्हावे असा एक प्रस्ताव दिला. त्यानंतर ह्या सभागृहामध्ये मी स्वतः ते फलक लागत नाहीत तसेच धनराज अग्रवालजी यांनी, फलक लागले पाहिजे अशी विनंती केली. जे ठराव झालेले आहेत ते फलक आज या शहरामध्ये लागत आहेत म्हणून मी मा. महापौरांचे अभिनंदन करीत आहे. असे लवकरात लवकर निर्णय झाले तर या शहराचा विकास नक्कीच होणार आहे. सर्व प्रशासकिय अधिकाऱ्यांचे आणि ज्या सदस्यांनी या प्रस्तावाला अनुमोदन केले होते त्या सर्वांचे मी अभिनंदनाचा ठराव या ठिकाणी मांडत आहे आणि ते फलक अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर लावावेत अशी मी विनंती करीत आहे.

**ठराव क्र. :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांना नामकरणाचे फलक लावल्याबद्दल ही सर्वसाधारण सभा मा. महापौरांचे तसेच सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- ओमप्रकाश अग्रवाल.** **अनुमोदन :- धनराज अग्रवाल.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरजी आपल्या परवानगीने बोलतो. आता सभेच्या कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर लगेचच अभिनंदनाचे ठराव वगैरे येतात. योग्य वेळी असा ठराव यायला पाहिजे आणि ठराव मांडतो तर ठराव मांडता येतो का असा? त्यांनी चांगली भावना व्यक्त केलेली आहे. त्यांच्याशी आम्ही सहमत आहोत. परंतु कामकाजाच्या पद्धतीने कामकाज हाताळायला पाहिजे अशी आपणाला विनंती आहे.

**प्र. सचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सर्वप्रथम प्रश्नोत्तराचा तास ११.४० वाजता सुरु होतो हे डिक्लर करा. कारण आता जो वेळ फुकट गेला तो प्रश्नोत्तराच्या तासामध्ये गणण्यात येऊ नये. मा. महापौर महोदय, आपल्या महानगरपालिका विभागामध्ये सर्वप्रथम झोपडपट्टीधारकांना फोटोपास देण्यांत यावा. महाराष्ट्र शासनाच्या या निर्णयाची पायमल्ली गेल्या दिड-दोन वर्षापासून होत आहे. अनेक कारणे याला महानगरपालिकेमार्फत दाखविण्यांत येत आहेत की, आम्हाला जी.आर. मिळालेला नाही, आमच्याकडे स्टेशनरी उपलब्ध नाही, आमचा सर्वे अजून पूर्ण झालेला नाही, कामकाज चालू आहे अशी अनेक कारणे आम्हांला मागच्या मिटींगपर्यंत देण्यांत आली. सगळ्यात कहर म्हणजे मागच्या वेळेला या प्रश्नाचे उत्तर माझ्याकडे लेखी स्वरुपात आले ते म्हणजे महानगरपालिकेतर्फे त्यावेळी फोटोपास देण्यातच आले नाहीत. ह्याच्याकरीता मी आपल्याला खास करुन सांगू इच्छितो. तत्कालीन महानगरपालिकेचे प्रभारी आयुक्त शिवमुर्ती नाईक यांचे मिरा भाईंदरच्या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये फोटोपास देत असतानाचे फोटो या शहरातील सर्व नागरिकांनी पाहिलेले आहेत. असे असतांना सुद्धा महापालिका प्रशासनातर्फे माझ्यासारख्या एका सदस्याने प्रश्न विचारला असतांना छापील स्वरुपाचे तदांत खोटे असे उत्तर या प्रश्नोत्तराच्या माध्यमातून मला देण्यांत आलेले आहे. वास्तविक पाहता हा प्रश्न एवढा महत्वाचा नाही आहे. तुम्हांला काही अडचणी आल्या असतील तर तुम्ही सांगायला पाहिजे होते कि, ह्या अडचणीस्तव हा कार्यक्रम आम्ही तुर्तास खंडीत किंवा स्थगीत ठेवलेला आहे. परंतु सरळ सरळ त्या वर्तमानपत्राचा आधार सुद्धा घेतला नाही किंवा काही विचार न करता धडधडीत हे उत्तर दिले गेलेले आहे. या शहरामध्ये झोपडपट्टीधारकांना शासनाने दिलेला जो हक्क आहे तो लवकरात लवकर मिळावा. त्या झोपडपट्टीधारकांना शासनाच्या त्या योजनेचा मोबदला आणि त्यांना जे यापुढे होणारे त्रास आहेत. आता आपण नुकतेच पाणी कनेक्शन देण्याचे धोरण केलेले आहे ते सुद्धा अत्यंत वादग्रस्त आहे. पुढे मी त्या विषयावर सुद्धा बोलणार आहे. त्याकरिता अनेक ठिकाणी त्यांना सर्व माध्यमातून मदत व्हावी ह्या एकमात्र दृष्टीकोनातून मी हा प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला. कारण आज शासनाकडून त्या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांची हालत एवढी खराब आहे. त्यांना आई जेवायला घालू देत नाही आणि बाप भिक मागू देत नाही. अशी त्यांची हालत आहे. कारण महाराष्ट्र शासनातर्फे नवीन शिधापत्रिका जेव्हा काढण्यांत आल्या त्या शिधापत्रिकांवरती सुद्धा पुढचा मागचा विचार न करता शासकीय अधिकाऱ्यांनी एक परिपत्रक जारी करुन निरंक हा शिक्का मारायचा ही नवीन प्रथा चालू केली. वास्तविक पाहता कोणाचेही पर्सनल डॉक्युमेंटस् हे मॉडीफाय करतांना , त्याच्यात सुधारणा करतांना त्याच्यातील जी हिस्ट्री आहे, त्याच्यातील रेकॉर्डस् आहेत ते बदलायचा कोणालाही अधिकार नसतो. ज्या माणसाचे ते डॉक्युमेंट आहेत त्याची नाहरकत असल्याशिवाय कुठलाही फेरबदल करायचा अधिकार नसतो. परंतु त्या ठिकाणी जुनी शिधापत्रिका चेंज करुन नवीन शिधापत्रिका देत असतांना जाणूनबुजून त्याच्यावर निरंक मारावे असा शिक्का मारायचा असे शासनाकडून एक परिपत्रक निघालेले आहे. आम्ही त्याची रितसर तक्रार केली आहे. चौकशी चालू आहे. निर्णय होईल तेव्हा होईल परंतु अशा कैचीमध्ये अशा पेचामध्ये सर्व ठाणे जिल्हा आणि मुंबई या ठिकाणचा सर्व जो रेशनिंगधारक आहे तो याच्यामध्ये बळी पडत आहे. कारण ती प्रथा एवढी चुकीची आहे कि आज त्या धारकांनी जायचे कुठे कारण एकतर तुमच्याकडून फोटोपास ॲलर्ट होत नाही. रेशनिंग कार्डमध्ये जाणुनबुजून चुका केल्या जातात. त्यामुळे आज माझ्या जर मुलाचे स्वतःचे जरी डोमीसाईल सर्टिफिकेट जरी काढायचे झाले. तरी सुद्धा माझ्याकडे त्या योजनेमुळे कारण ती योजना पूर्ण होत नाही तोपर्यंत निरंक मारावा असे त्या परिपत्रकात दिलेले आहे. हा त्रास सर्व लोकांना होतोय. फोटोपास चांगल्या प्रतिचा द्यावा. फोटोपासचे नुतनीकरण म्हणजे जे कार्ड आहे, जुने कार्ड वाटले ते निराळे आहे. आता परत मॉडीफिकेशन करुन आणले आहे. आता नवीन परत जी.आर. आला. काही ठिकाणी आपण जुन्या लोकांचे पैसेही घेतले आहे. पैसे किती घेतले त्याचाही या ठिकाणी उल्लेख नाही. फी किती घेतली. आता नवीन फी किती घेणार ह्याचा उल्लेख केलेला नाही. मागे जे शासनामध्ये सर्व सहभागी पक्ष आहेत त्यांनी आताच एक महिन्यापुर्वी मंत्रालयात बैठक घेऊन मंत्रीमंडळ स्तरावरती निर्णय झाला आणि या फोटोपासची फी कमी करण्यांत आली. साडे सहा हजारावरुन जवळ जवळ साडे सहाशे रुपयांवर ही फी आली हा नवीन निर्णय झाला. या नवीन निर्णयानुसार किती पैसे आपण घेतले आणि जुन्या निर्णयानुसार लोकांना किती पैसे आपण

लोकांकडून घेतले आहेत आणि किती देय आहेत. म्हणजे किती लोकांना तुम्ही परत करणार आहात. परतावा किती आहे. ह्याचा कुठेही यांच्यामध्ये उल्लेख नाही हे उत्तर सरळ सरळ सभागृहाची दिशाभुल करणारे आजही माझ्याकडे आलेले आहे. माझे असे स्पष्ट मत आहे कि, अजुनपर्यंत याच्यामध्ये मॉडीफाय करुन द्यावे कारण मागे जी काही पाच-दहा जी काही एक्स, व्हाय, झेड जे काही फोटोपास ॲलॉट केले असतील त्यांची फी तुम्ही जरुर घेतली असेल. त्याचा इथे कुठेही उल्लेख नाही. आता नवीन आपल्या हस्ते एक लवकर कार्यक्रम गेल्या महिन्यामध्ये झाला फार दु:खाची बाब आहे. प्रशासनातर्फे मी एक या पक्षाचा गटनेता आहे. आपला कार्यक्रम झाल्यानंतर दोन दिवसानंतर या कार्यक्रमाची पत्रिका मला माझ्या घरी मिळाली कि, अमुक तारखेला कार्यक्रम आहे आणि दोन दिवसानंतर त्याची निमंत्रण पत्रिका मिळते. मला फार वाईट वाटले. मला त्या कार्यक्रमाला हजर राहायची इच्छा असून सुद्धा राहता आले नाही. कारण निमंत्रण मिळाले नव्हते. ते निमंत्रण माझ्या घरी दोन दिवसानंतर लेट मिळाले हे आज मी माझ्या भाषणात सांगू इच्छितो. ह्या झोपडपट्टीच्या बाबतीमध्ये शासनाने म्हणजे नगरपालिकेने स्पष्टपणे खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

**मा. उपायुक्त (नाईक सो.) :-**

मा. महापौर मॅडम, महापालिकेने शासनाच्या आदेशाची आतापर्यंत पायमल्ली केली हे म्हणणे संयुक्तिक नाही. कारण पहिला जो शासन निर्णय आला तो ११ जुलै २००१ रोजी आला आणि २००१ ला आल्यानंतर आम्ही सर्वे केला आणि सर्वात पहिला सर्वे या महापालिकेचा झाला. या सभागृहाला जेवढे झोपडपट्टी नागरिकांविषयी प्रेम आहे. तेवढेच प्रशासनाला सुद्धा आस्था आहे. त्यानंतर रक्कमेबाबत वाद उपस्थित झाला. पहिल्या शासन निर्णयाप्रमाणे निवासी २२५ स्क्वेअर फुटाला नऊ हजार एकशे अशी फी होती. ती दुरुस्त करुन ती ३२५ झाली. नंतर दुकान आणि निवास ह्यांना १८,२०० होते. ते दुरुस्त करुन १०,२०० झाले आणि व्यापारी व्यावसायिक २२५ स्क्वेअर फुटाला २७,३०० होते. ते १५,२०० झाले. म्हणजे हा शासन निर्णय आम्हांला ३ मे, २००३ रोजी मिळाला. त्यानंतर काही झोपडपट्टी धारकांना आम्ही दहा झोपडपट्टी लालबहादूर आणि झोपडपट्टी वसाहतीमधील दहा लोकांना फोटोपास वाटले होते. त्यावेळेला त्याची फी होती दहा हजार रुपये आणि ती फी न दिल्यामुळे आणि शासनाचा असा निर्णय होता की, फोटोपास देताना ती रक्कम वसुल करावी. ते दहा हजार रुपय न दिल्यामुळे फोटोपास परत घेतलेले आहेत आणि त्यांना नवीन रक्कम रु. ३२५/- सांगितली आहे. तिनशे पंचवीस रुपये ज्यावेळेला देतील त्यावेळी आम्ही लगेच फोटोपास देऊ. आतापर्यंत महापालिकेने १६१ फोटोपास दिलेले आहेत आणि त्याचवेळेस रक्कमेचा स्विकार केलेला आहे. यापुढे या सभागृहाने तारखा जाहिर केल्या तर त्या त्या वेळेला प्रशासन केव्हाही तयार आहे फोटोपास देण्यासाठी. मात्र यामध्ये आपण पायमल्ली केली किंवा झोपडपट्टीधारकांना त्रास दिला असे काही नसून सर्वे तयार आहे, फोटोपासही तयार आहेत. फक्त फोटोपासमध्ये बदल एवढाच केला कि, एका झोपडपट्टीचे फोटोवर एका व्यक्तीचा फोटो होता तरी त्या फोटोवर पती-पत्नीचा फोटो असावा. कारण पतीने एक आणि पत्नीने एक असे दोनदा होऊ नये किंवा दोन झोपडपट्टीत राहून दोन फोटो होऊ नये म्हणून एकत्रित फोटो काढून वाटप करावे ही सर्वांची इच्छा होती की, दोन झोपडपट्टीत एका फोटोपासचा वापर होऊ नये म्हणून आम्ही दोघांना एकत्र करुन फोटो काढून लावत आहोत आणि जसा जसा आपण कार्यक्रम पदाधिकारी ठरवतील तस तसे फोटोपास वाटायचे अशी केव्हाही महापालिकेने तयारी ठेवलेली आहे. आपण तो निर्णय घ्यावा आणि प्रशासनाने या आदेशाची पायमल्ली कधीही केली नाही आणि झोपडपट्टीधारकांना ज्या सेवा सुविधा उपलब्ध करुन द्यायच्या आहेत या महापालिकेने तातडीने सेवा सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत आणि यापुढेही देणार आहे.

**रोहिदास शंकर पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, मा. उपायुक्तांनी आता सांगितले की, प्रशासनाने पायमल्ली करण्याचा प्रयत्न कुठेही केलेला नाही. प्रशासनाने काहीच करण्याचा प्रयत्न केला नाही असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. जर काही केलेच नाही तर पायमल्ली होत नाही. आमच्या माहितीनुसार हे सर्व कामकाज हे सभागृहाच्या कामकाजाचा प्रश्नच येत नाही. जे फोटोपास वाटपाचे कामकाज आहे त्याचे काही नियम आहेत. शासनाचा तसा आदेश आहे आणि त्याचा तसा पिरियड आहे. तर त्या पिरियडमध्ये तुम्हाला वाटायला ह्या सभागृहाने काही कार्यक्रम ठरवावा असे जे निवेदन झाले ते कसे योग्य वाटत नाही. खरेही वाटत नाही. मला असे वाटते की, आपण आपला कार्यक्रम ठरवा की, इतक्या झोपडपट्टीची तयारी झालेली आहे. फोटोपासची तयारी झालेली आहे आणि हे प्रशासनाचे कार्यक्रम आहेत. ज्या सन्मानीत नगरसेवकांना त्याच्यामध्ये सहभागी होता येईल ते त्यात सहभागी होतील. अन्यथा एखाद्या नगरसेवकांची जर तशी मानसिकता नसेल तर ते फोटोपास पासून झोपडीधारक वंचीत राहू नयेत किंवा प्रशासनाने नगरसेवकांवरती ढकलू नये. याच्यासाठी मी प्रयत्न केलेला आहे. मला असे वाटते की, हे काम अत्यंत उशिराने झालेले आहे. आधी फोटोपास वाटपाच्या कार्यक्रमाचे पत्र उशिराने मिळाले. कार्यक्रम करायचा म्हणून मला पत्र मिळालेले होते तरी मी तीनचार

वेळा चौकशी केली की फोटोपास तयार असतील तर त्यांच्या वाटपाची काय सिस्टम तयार केली आहे आणि ते कोण सांगणार आणि कुठे देणार आहात. मला विचारले गेले की, कार्यक्रम करणार आहात. तरी कार्यक्रम नाही तरी तुम्ही फोटोपास वाटाल तर केव्हा वाटाल कारण की, ते नीट पोहचले पाहिजेत. तर त्याचे मला नीट उत्तर मिळालेले नाही. मला एवढेच म्हणायचे आहे की, हे प्रशासनाचे कामकाज आहे आणि त्याच्यावर कोणताही नविन निर्णय न घेता त्याला आणखी वेगळा फाटा न देता झोपडपट्टीधारकांना फोटोपास लवकर मिळतील असा प्रयत्न करावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलत आहे की, झोपडपट्टी धारकांना फोटोपास द्यायचा हा जो कार्यक्रम आहे. मला वाटते की, सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटीलजी आपण ज्या प्रभागात आहात एक उदाहरण की, मी ज्या प्रभागात आहे तर त्या प्रभागात दोन झोपडपट्ट्या आहेत. पहिल्या झोपडपट्टीधारकांना जर फोटोपास वाटप सुरु केले ते कोठार झोपडपट्टीमध्ये केले आणि त्या कोठार झोपडपट्टीमध्ये फोटोपास वाटप केल्यानंतर मला असे समजले की, आपणही आपल्या प्रभागामध्ये झोपडपट्टी आहे तर त्या झोपडपट्टीमध्ये सुद्धा फोटोपास वाटप केले पाहिजे. तर आपल्या येथे जे अधिकारी आहेत श्री. संख्ये आणि इतर जे अधिकारी आहेत तर त्यांना मी माझ्या केबीनमध्ये बोलाविले आणि त्यांना सांगितले की, माझ्या एरियामध्ये जी झोपडपट्टी आहे त्याचे फोटापास आपण तयार केलेत का? तर त्यांच्याकडून असे उत्तर मिळाले की, हो आम्ही तयार करतो. तुम्ही सांगाल तसा आम्ही कार्यक्रम लावू. तसेच ज्याप्रमाणे मी माझ्या प्रभागात फोटोपास वाटप केले तसेच सन्मा. सदस्यांनी आपल्या प्रभागात ज्या झोपडपट्ट्या असतील आणि त्यांनी जर तसे सांगितले की, आमच्या प्रभागामध्ये झोपडपट्ट्या आहेत आणि त्या झोपडपट्टीचे जर फोटोपास तयार असतील तर त्यांनी सुद्धा मा. महापौरांना सांगून तसा कार्यक्रम लावावा. कारण जसे आम्ही श्री. महेंद्रसिंग चौहाण आणि मी व रिटा शहा आम्ही सदस्यांनी तो कार्यक्रम लावला तसे सगळ्या सन्मा. सदस्यांनी कार्यक्रम लावावा. म्हणजेच प्रशासनाची तिथे फारशी गरज लागणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, म्हणजे ज्याला कार्यक्रम लावायचा त्यांनी लावावा, नाही यायचे नाही तर नको येऊ, यायची इच्छा असेल तरी बोलवायचे नाही ही पद्धत प्रशासकीय कामाची नाही. सन्मा. सभागृह नेत्यांनी सर्व सभागृहाला बरोबर घेऊन चालले पाहिजे. या अगोदरसुद्धा तक्रार केलेली आहे. आमचा प्रभाग नाही आहे. बाजूला झोपडपट्टीमध्ये कार्यक्रम लावला. मा. महापौर मॅडम आपण आलेल्या होत्या. पण आम्हांला त्याचे निमंत्रण आले नव्हते. ही प्रशासकीय कामाची पद्धत नाही. त्या प्रभागातला हा शासकीय कार्यक्रम आहे. एखादा जर त्याच्या निधीतून त्यांनी कार्यक्रम केला असेल तर आम्हांला बोलाविले नाही तर आम्ही त्यावर आक्षेप घेणार नाही. पण प्रशासकीय कामाला प्रत्येक जसे कोठार झोपडपट्टीचे कार्यक्रमाचे आम्हांला निमंत्रण आलेले होते, मी त्या ठिकाणी गेलेलो होतो. कार्यक्रमास उशीर झाला म्हणून मी तेथून निघून गेलो. ही पद्धत बंद करा. ज्यांना कार्यक्रम लावायचा असेल त्यांनी लावा असे नाही. हा प्रशासकीय कार्यक्रम प्रशासकीय पद्धतीने लावला पाहिजे अशा सुचनांची तुम्ही नोंद करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम माझा तसा उद्देश नव्हता. मी फक्त सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांना असे सांगितले की, माझ्या प्रभागात जशी झोपडपट्टी होती आणि मी त्या कार्यक्रमाचा त्या पद्धतीने मी पाठपुरावा केला आणि अधिकाऱ्यांना बोलाविले आणि मा. महानगरपालिकेचे प्रथम महापौर आणि आयुक्त साहेब यांच्या आदेशाने कार्यक्रम लावला. तशाच प्रत्येक वॉर्डामध्ये ज्या झोपडपट्ट्या आहेत त्या प्रभागातील सन्मा. नगरसेकांनी आपण दिलेच पाहिजे आणि आता ओमप्रकाश म्हणतात मी पण बाजूचा आहे परंतु ती झोपडपट्टी आमच्या प्रभागात येत असल्यामुळे मा. महापौरांना, मा. उपमहापौरांना, आयुक्त साहेबांना आणि आमच्या सगळ्या नगरसेवकांना निमंत्रण दिले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझा तुमच्यावर आरोप नाही, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या कामामध्ये ज्या पद्धतीने भेदभाव करतात तो केला नाही पाहिजे. हा शासकीय कार्यक्रम आहे. तुमच्या निधीचा कार्यक्रम नाही. तुमच्या निधीचा तुम्ही घ्या तुमच्या वॉर्डामध्ये आम्हांला बोलावू नका. प्रशासकीय कार्यक्रम असतांना कुठल्या वॉर्डाचा नगरसेवक कुठला नगरसेवक येणार किंवा नाही त्याची काळजी करायची तुम्हांला गरज नाही. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दुसऱ्यांना चुक केलेली आहे, अशी चुक करु नये.

**मोहन पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम यांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, मिरा भाईंदर नगरपालिका स्थापन झाल्यापासून ते मिरा भाईंदर महानगरपालिका होईपर्यंत ज्या झोपडपट्टीचा जो प्रश्न होता त्या प्रश्नावर मला वाटते आम्हांला सर्वांना सांगायला गर्व होईल असे की, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रथम फोटोपासचा जो

प्रश्न होता तो प्रथम सोडविण्यासाठी आपल्या प्रशासनाने आणि प्रशासनाच्या बरोबर सर्व सन्मा. सदस्यांनी चांगले प्रयत्न केले आणि महाराष्ट्रामध्ये प्रथमच मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर प्रथमच फोटोपासचा कार्यक्रम ह्या ठिकाणी जाहीर झाला आणि त्याची संपूर्णपणे अंमलबजावणी सुरु झालेली आहे. सन्मा. सदस्यांच्या खंत आहेत ज्या त्यांच्या खंत आहेत. त्या खंताचा विचार केला पाहिजे आणि त्यांचे विचार या ठिकाणी आले तरी त्याच्या बहुमुल्य विचारावर विचारमंथन सुद्धा झाले पाहिजे. परंतु कोठेतरी आपण एका बाजूला हा सुद्धा विचार केला पाहिजे की, प्रशासन काय करते आणि प्रशासन म्हणजे काय आहे? जर प्रशासनच करत असती तर आपली आवश्यकता नसती. या ठिकाणी प्रशासनाच्या बरोबरीने आपले एक चांगले उपक्रम पाहिजे तरच हा चांगला अश्वमेघ किंवा रथ आपण हाकलू शकू आणि मिरा भाईंदरमध्ये चांगले काम करु शकतो आणि जिल्ह्यात कुठेही अशा प्रकारे फोटोपास अजून वाटलेले नाहीत आणि ठाणे जिल्ह्यामध्ये आणि प्रथमच मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये हे फोटोपास वाटले गेले. सर्व सन्मा. सदस्य ज्यांनी सहभाग घेतला. यात सर्व सदस्यांनी सहभाग घेतला. सहभागी असलेल्या सदस्यांच्या भावना, झोपडपट्टीवासियांच्या बाबतच्य भावना चांगल्या आहेत तरी त्यांनी झोपडपट्टीवासियांसाठी त्यांनी चांगले प्रयत्न केलेले आहेत. झोपडपट्टीवासियांना चांगल्या सुख सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. झोपडपट्टीवासियांकरिता ज्या स्कीम आपल्या सुवर्ण जयंती रोजगार योजनेबाबत बोला किंवा शासनाच्या माध्यमातून बोला त्या सर्व सुविधा देण्यांसाठी ज्या सर्व सन्मा. सदस्यांनी याच्यात सहभाग घेतला तर त्या सर्व सन्मा. सदस्यांना मी धन्यवाद देतो आणि आपली खरोखरच कळकळ आहे आणि अशा पद्धतीने आपण जो झोपडपट्टीचा विषय या ठिकाणी काढला त्याच्यामध्ये एक अंकुश किंवा एक प्रश्न त्याच्यामध्ये केला पाहिजे किंवा निर्धार आपण केला पाहिजे की, झोपडपट्ट्यांना ज्या सुविधा आपण देतो तेवढीच जबाबदारी या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रतिनिधीची सुद्धा आहे की, झोपडपट्टीची वाढ होता कामा नये. आज ही झोपडपट्टी कुठे तरी शिथील झाली पाहिजे किंवा ती लिमिटमध्ये आली पाहिजे. कारण की त्यांना सुविधा सुद्धा दिल्या पाहिजे. सन १९९५ पर्यंतच्या झोपडपट्टीवासियांना ज्या सुविधा लागतील त्या आपण दिल्या पाहिजेत. शासनाकडून सुविधा आल्या पाहिजेत. तसेच महानगरपालिकेकडून सुद्धा सुविधा झाल्या पाहिजेत. परंतु ज्या झोपडपट्ट्या वाढताहेत हा मा. महापौर मॅडम ही खंत आहे. आपल्या या शहराची ही महत्वाची खंत आहे. आपल्या शहराच्या झोपडपट्टीमध्ये कोणता वर्ग येतो आहे हे महत्वाचे नाही. झोपडपट्टीमध्ये कोणत्या प्रांताचे लोक येत आहेत हे सुद्धा महत्वाचे नाही परंतु झोपडपट्टी वाढ झाल्यानंतर या शहराचे जे नियोजन आहे या नियोजनावर निश्चित परिणाम होतो असे माझे मत या सभागृहात व्यक्त करायचे आहे. मी सर्व सन्मा. सदस्यांना नम्र निवेदन करेन, विनंती करीन की, झोपडपट्टी ही एक आदर्श झोपडपट्टी झाली पाहिजे. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये त्यांच्या चांगल्या योजना मला वाटते सन्मा. आमचे डी.एम.सी. नाईक साहेब याच्या विषयी माहिती देतील आपल्याला की, ज्यांना फोटोपास द्यायचे त्यांचा पुढचा कार्यक्रम काय आहे? त्याची माहिती देतील. आणि याबाबत सर्व सन्मा. सदस्यांना माहिती आहे. मी एवढीच विनंती करीन मा. महापौर मॅडम की, आपल्या प्रशासनाकडून तसेच लोक प्रतिनिधींकडून आपल्या ह्या झोपडपट्टीविषयी कोणत्याही प्रकारे झोपडपट्टीमध्ये वाढ होता कामा नये याचे बंधन आपण पाळले पाहिजे आणि उर्वरित वॉर्डातील ज्या झोपडपट्ट्या आहेत तरी त्या झोपडपट्टीवासियांना फोटोपास द्यायचे आहेत. तरी हा कार्यक्रम प्रशासनाला मी सांगू इच्छितो की, ज्या सन्मा. सदस्यांनी खंत केली तरी त्यांनी चांगल्या खंत व्यक्त केल्या. खंत व्यक्त करण्याचा अधिकार या महासभेमध्ये असतो आणि महासभेमध्ये बोलल्यानंतर त्याचे निश्चित परिणाम बाहेर उमटतात आणि त्याचे चांगले फळ ह्या ठिकाणी मिळते आणि हा विश्वास आमच्या सर्व सन्मा. सदस्यांचा आहे म्हणून मी या ठिकाणी एकच विनंती करु इच्छितो की, सर्व प्रभागातील ज्या झोपडपट्ट्या असतील तर त्या सर्व प्रभागातील सर्व सन्मा. सदस्यांना आपण कार्यक्रम त्यांना जाहिर करुन द्यावा. सात ते आठ दिवस आगोदर कार्यक्रम जाहीर करुन देण्यांत यावा आणि ह्या सात ते आठ दिवसांच्या कालावधीमध्ये त्या सर्वांना निमंत्रण देऊन हा कार्यक्रम चांगल्या पद्धतीने पुढे न्यावा एवढीच मी या ठिकाणी इच्छा व्यक्त करतो. धन्यवाद.

**रोहिदास शंकर पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, सन्मा. सदस्य स्थायी समिती चेअरमन श्री. मोहनजी पाटील यांनी त्यांच्या भावना मांडल्या तर मी एक अपेक्षा करीन की, जेव्हा हा विषय सभागृहात येतो तर सभागृहाला त्याची निश्चित जाणीव व्हायला पाहिजे. कारण हे फक्त सभागृहच चर्चा करतो किंवा व्यक्तीगत चर्चा होते असे नाही आहे. सभागृहाला बाहेर प्रेक्षक गॅलरी आहे आणि पत्रकारही आहेत की, आजच्या घटकेला फोटोपास देते वेळी आलेले आहेत. जसे मघाशी मा. नाईक साहेबांनी सांगितले, अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे हा. कुणी विशिष्ट वर्गाचा, एखाद्या टोळीचा हा धंदाही होता कामा नये. श्री. मोहनजी पाटील बोलले त्यांचे तथ्य किंवा मर्म तेच असेल असे मला वाटते. आपण फोटोपास देते वेळी आपल्या प्रशासनाला आलेले अनुभव जर असतील तर त्यांनी ते सांगावे की, एखादी झोपडी

किती जणांच्या नांवे लागली. एखाद्या झोपडीत किती जण फोटोपास घ्यायला आलेत आणि माझी अशी अपेक्षा आह या सभागृहासमोर आपणांस विचारतो आहे की, आपण आजपर्यंत किती फोटोपास कोणकोणत्या झोपडपट्टीत दिले याचे जर निवेदन झाले तर साधारणतः कोणत्या प्रभागामध्ये किती वेगाने झोपडपट्टी वाढली किंवा वाढत आहे. कदाचित त्या आपण ज्या झोपडपट्टींना पास देत आहोत ते सन १९९५ च्या आधीच्या लाकांना देतो. तरी सन १९९५ नंतर कोणत्या प्रभागामध्ये किती वेगाने झोपडपट्टी वाढली त्याच ह्या सभागृहाला अवलोकन करता येईल. म्हणून त्या पद्धतीने आपण त्याचे विश्लेषण करावे अशी मी विनती करतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर महोदय, माझा दुसरा प्रश्न राहिला. कारण प्रश्न बाजूला राहीला भाषणे चालू झाली.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम मागे जेव्हा माझा प्रश्न होता तसेच जेव्हा दुसऱ्यांच्या प्रश्नाच्या वेळी मी उठून बोलली तेव्हा सचिवांनी सांगितले की, ज्यांचा प्रश्न आहे तोच त्याचे उत्तर विचारु शकतो आणि तेच हे करु शकता. आता आजचे जे चाललेले आहे. मी मुद्दाम बोलत नव्हती. पण मला आता बोलावेच लागते की जेव्हा मी उठते तेव्हा मला कायदेकानुन दाखवतात आणि बाकी लोक हेच काम करतात तेव्हा त्यांना कायदेकानून नसतात. म्हणजेच सर्वांसाठी तुम्ही नियम सारखे ठेवा. कारण ज्यांचा प्रश्न आहे त्यांनाच उत्तर द्या आणि त्यांनाच बोलायला द्या. तर ह्या प्रकारे काम होणार नाही. ज्यांचा प्रश्न आहे तो बाजूला बसतो आणि दुसरे बडबड करतात तरी असे होता कामा नये. जसे कायदे मला दाखविले तरी आपण ते सर्वांना दाखवा.

**अशोक पाटील :-**

सन्मा. उपमहापौर मॅडम सभागृहामध्ये झोपडपट्टीवासियांना फोटोपास वाटप करण्याच्या संदर्भात भरपूर चर्चा झाली. आपण योग्य तो निर्णय द्यावा की नक्की याबद्दल आपण काय भुमिका घेणार आहात.

**मा. उपायुक्त (नाईक सो.) :-**

यामध्ये प्रशासन आणि पदाधिकारी ही दोन चाके आहेत त्यामुळे प्रशासनाने निर्णय घेऊन जर फोटोपास वाटप सुरु केले तर आम्हांला न विचारता फोटोपास वाटप सुरु केले हे पण आरोप पुढच्या मिटींगला येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गटनेत्यांनी बसून त्या तारखा फिक्स कराव्यात आणि निमंत्रण पत्रिकाही काढाव्यात त्यामुळे अचानक एक दिवस अगोदर सांगून जर आपण कार्यक्रम घेतला तर कुणाचे तरी पत्र पोहोचण्याचे राहून जाते आणि यामध्ये सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेबांनी सांगितले की, दिरंगाई झाली. शासन निर्णय आला ३ मे २००३ ला. ३ मे, २००३ ला आल्यानंतर रिवाईज रक्कमा कराव्या लागल्या. त्यामध्ये नऊ हजाराऐवजी तिनशे पंचवीस रुपये घ्यायचे ठरले. ती लिस्ट तयार करणे, फोटोपास नविन बनविणे किंवा त्यात बदल करणे यामुळे उशीर झाला. जर प्रशासनाने भराभर फोटोपास वाटप निरनिराळ्या ठिकाणी जाऊन वाटप केले तर पदाधिकारी म्हणतील की, आम्हांला विचारलेच नाही. तुम्ही कसे काय फोटोपास वाटप केले. त्यामुळे गटनेत्यांनी कृपया मिटींग घ्यावी. तारखा फिक्स कराव्यात. कुठल्या झोपडपट्टीत किती द्यायचे, किती तारखेला द्यायचे. त्यामुळे कामात सुसूत्रता येईल आणि या पुर्वी ज्या झोपडपट्टीत फोटोपास वाटलेले आहेत साईबाबा नगर २३, हनुमान झोपडपट्टी ३७, आणि कोठार झोपडपट्टी १०१ या ठिकाणी फोटोपास वाटप केलेले आहेत.

**रोहिदास शंकर पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, सभागृहाच्या कामकाजाच्या पद्धतीसाठी बोलतो आहे की, सगळे ह्या सभागृहातील नियम पाळण्याच्या क्षमतेत आहोत. मघाशी सन्मा. मॅडमनी सांगितले की, बडबड करायचे काही मागे येणार नाही किंवा बडबड करु नये. बडबड शब्दाचा अर्थ त्यांच्या डिक्शनरीत कोणता असेल तर तो वेगळा असेल. परंतु माझ्या माहितीनुसार सभागृहाचे कामकाज म्हणून या सभागृहात कोणीच बडबड करत नाही. आपल्या भावना व्यक्त करण्याचे प्रयत्न करतात. नियमावलीत प्रश्न असा आहे, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये उपप्रश्न विचारण्याची पद्धत आहे, अधिकार आहे. सचिवांनीच सांगितले की, विचारु नका. तर तसे त्यांना विचारले पाहिजे होते. तर ते कुठल्या नियमांत आहे. माझे सज्ञान आहे तेवढे मी सांगू शकतो की, प्रश्न जर कोणी विचारला असेल तर त्याला उपप्रश्न विचारु शकतो तो सभागृहाचा अधिकार आहे. आता अधिकार आहे किंवा नाही एवढेच रुलिंग द्या. मग पुढे प्रश्नच येणार नाही. अधिकार नाही सांगितला तर सन्मा. सदस्यांनी प्रश्न विचारला असेल ते बोलतील आणि ते बसतील.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम माझा एक प्रश्न आहे, काही दिवसांपूर्वी रेल्वेच्या हद्दीतील झोपडपट्टी तोडली गेली. प्रभाग क्र. ६ मध्ये ती झोपडपट्टी खुप जुनी होती. मला त्या झोपडपट्टीशी काही घेणं देणं नाही. परंतु ती झोपडपट्टी माझ्या प्रभागामध्ये बसवण्याचा प्रयत्न केला आणि मी त्याला स्ट्राँगली विरोध केला. त्या विरोधाला मा. आयुक्त साहेबांनी, उप आयुक्तांनी आणि आपणसुद्धा चांगले सहकार्य केले. वेळेवर ती झोपडपट्टी उठवली गेली. त्या झोपडपट्टीसंबंधी आपण काय निर्णय घेणार आहात. त्यांना फोटोपास देतांना कुठला निर्णय लावणार आहात आणि कुठला पत्ता लावणार आहात त्यासंबंधी जरा माहिती मिळाली तर बरे होईल.

**मा. उपायुक्त (नाईक सो.) :-**

नगरपालिका हद्दीत खाजगी जागा, शासकीय जागा, ही जर असेल तर आणि केंद्रशासनाची जागा असेल तर केंद्र शासनाने त्यांचे पुनर्वसन करावे आणि राज्य शासनाची जागा किंवा नगरपालिकेची जागा असेल तिथे नगरपालिकेने पुनर्वसन करावे.

**रोहिदास शंकर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, उपप्रश्नाचे उत्तर मिळाले तर यापुढील सभागृहाचे सगळेच कामकाज सुरळीत चालेल. उपप्रश्न विचारायचा कि नाही विचारायचे म्हणजे दुसऱ्या सदस्यांना नको तो शब्द वापरायला नको.

**मा. उपायुक्त (केळकर सो.) :-**

सन्मा. सभागृह सभेचे कामकाज उपविधीनुसार ज्या नगरसेवकांनी प्रश्न विचारला त्यांनाच उपप्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. परंतु पिठासिन अधिकाऱ्यांच्या मंजुरीने त्या चर्चेमध्ये स्पष्टीकरणात्मक भाग घेण्याचे इतर सदस्यांना सुद्धा अधिकार प्राप्त आहेत. पण अन्य सदस्यांना उपप्रश्न विचारता येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आता आपले जे रुलींग प्राप्त झाले आहे त्यानुसार माझ्या माहितीनुसार जो तो सदस्य उठून मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे असेच बोलले आणि सभागृहात भाषण चालू केले. मी बघतोय महापौरांनी तोंड सुद्धा उघडलेले नाही आणि रुलिंग सुद्धा दिलेले नाही. ही जी अर्ध्या तासांपैकी वीस मिनिटे फुकट गेली ती मला द्यावी. मला पुढचा प्रश्न चालू करायचा आहे. कारण पुढचा प्रश्न फार महत्वाचा आहे. या शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावरती माझा प्रश्न आहे. मी मागे उभा आहे परंतु ही चर्चा चालू राहिलेली आहे.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पुढच्या वेळेला माझा मागचा प्रश्न प्रायोरिटीवर आपण घ्यावा अशी विनंती.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३० चे वाचन केले)

**रोहिदास शंकर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एका विनंती करतो सर्वांना सोयीची होईल, आम्हांलाही सोयीचे होईल. आम्हांला घड्याळ बघायची सवय नाही. मागे जे घड्याळ लावलेले आहे ते सगळ्यांना दिसत नाही. ते मोठे लावा असे कुठेतरी लावा कि सर्वांना दिसेल.

**मा. उपायुक्त (नाईक सो.) :-**

सभागृहात सर्वांना दिसल अशा प्रकारे घड्याळाची व्यवस्था करण्यांत येईल.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय. दि. १४/०७/२००३ रोजी नामनिर्देशन पत्र स्विकारायच्या दिवशी एकूण पंधरा उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची दि. १७/०७/२००३ रोजी त्यापैकी पाच सदस्यांनी नामनिर्देशन पत्र मागे घेतली होती. दहा सदस्य आजच्या तारखेपर्यंत शिल्लक होते. परंतु आजच्या दिवशी ही नामनिर्देशन पत्र मागे घेऊ शकत होते. त्यामध्ये आज दोन उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज आलेले आहेत. ते खालील प्रमाणे आहेत.

१) श्री. केशव रामभाऊ घरत.

२) श्री. रोहिदास आत्माराम पाटील.

अशा दोन सदस्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतलेले आहेत. त्यामुळे स्थायी समिती निवडणुकीकरीता आठच सदस्य शिल्लक राहिलेले आहेत. त्यामुळे आठच जागा रिक्त होत्या.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम मी आपल्या परवानगीने बोलू इच्छितो. जर आपली परवानगी असेल तर दि. १४/०७/२००३ रोजी नामनिर्देशन पत्र स्विकारण्याची तारीख ठेवली होती. तसेच नामनिर्देशन पत्र

मागे घेण्याची तारीख देखील ठरली होती. मग त्या दिवशी उमेदवारांनी अर्ज मागे का घेतले नाही आणि आजच अर्ज का मागे घेतले. याचा आपण खुलासा करावा आणि अशी सिस्टम आहे का? ज्या दिवशी नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची तारीख होती त्या दिवशीच त्यांनी मागे घेतले पाहिजे होते. आता सभागृहाच्या पुढे त्यांनी पत्र पाठविले आणि ते उमेदवारी अर्ज मागे घेतात ते कुठल्या कायद्यामध्ये नियम आहे का?

**प्र. सचिव :-**

उपविधीमध्ये तशी तरतुद आहे. रितसर नामनिर्देशन केलेल्या कोणत्याही उमेदवारास निवडणूक प्रक्रिया चालू होण्यापूर्वी कोणत्याही वेळी आपली उमेदवारी मागे घेता येईल अशी उपविधीमध्ये तरतुद आहे.

**रोहित सुवर्णा :-**

कोणत्या सेक्शन खाली आहे.

**प्र. सचिव :-**

उपविधीमध्ये.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपल्या महानगरपालिकेची उपविधी मंजुर झाली आहे का?

**रोहित सुवर्णा :-**

आपली उपविधी मंजुर आहे का? ते फक्त प्रपोजल आहे.

**मा. उपायुक्त (नाईक सो.) :-**

मा. महापौर मॅडम, ज्यावेळेला उपविधी प्रारुप प्रसिद्धी होऊन हरकती सुचना मागवल्या जातात आणि मंजुरीसाठी पाठवल्या जातात. मंजुर होऊन येण्यापूर्वी ते वर्किंगमध्ये असते. मंजुर होऊन बदल होऊन येईपर्यंत ते जे नियम आहेत ते नियम वापरता येतात. कारण या सभागृहाने डेव्हलपमेंट प्लॅन मंजूर केला. डेव्हलपमेंट प्लॅन प्रसिद्धीकरण झाले. हरकती, सुचना मागवल्या. हरकती, सुचना ऐकल्या आणि मंजुरीसाठी शासनाकडे पाठवले. परंतु जे प्रसिद्धी केलेले नियम होते किंवा जी डेव्हलपमेंट प्लॅन वापरात होती ती फोर्समध्ये होती. जोपर्यंत बदल होऊन मंजुर होत नाही तोपर्यंत तसेच प्रत्येक उपविधी प्रसिद्धीकरण करुन हरकती सुचना मागविल्यानंतर आलेल्या हरकती सुचनांवर विचार करुन मंजुरीसाठी पाठविले कि, ते नियम वर्किंगमध्ये येतात, जोपर्यंत शासन निर्णय मिळत नाही. मिळाल्यानंतर काही बदल करुन मंजुरी देतील, नाहीतर जैसे थे मंजुरी मिळेल. मात्र ते नियम वापरात योग्य ठरतात.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आजपर्यंत आम्हांला उपविधीची कॉपी देखील मिळालेली नाही. तर त्याच्यामुळे आम्हांला हे नियम कधीच वाचायला मिळत नाही. म्हणून सर्व सन्मा. सदस्यांना उपविधीची कॉपी देण्यांत यावी. कारण आम्हांला कुठला प्रॉब्लेम होणार नाही आणि आपल्या सभागृहाचा वेळसुद्धा वाचेल.

**प्र. सचिव :-**

काही सदस्यांना उपविधीची कॉपी देण्यांत आलेली आहे. तरीसुद्धा इतर सदस्यांना उपविधीची कॉपी देण्यांत येईल.

मा. महापौरांच्या वतीने बोलतोय, मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण (२) नियम २०(५) नुसार स्थायी समिती आठ सदस्य रिक्त पदासाठी दि. १४/०७/२००३ रोजी एकूण पंधरा सदस्यांनी आपली नामनिर्देशन पत्र दाखल केलेली होती. परंतु नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या विहित तारखेस आणि निवडणूक प्रक्रिया प्रारंभ होणे अगोदर असे एकूण ७ सदस्यांनी आपली नामनिर्देशन पत्रे मागे घेतली. स्थायी समिती सदस्य आठ पदे रिक्त असल्याने व उमेदवार आठच शिल्लक राहिल्याने सदरहू आठ सदस्य बिनविरोध निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे. त्यांची नांवे खालीलप्रमाणे :-

१) श्री. आसिफ गुलाब शेख.
२) श्री. घोन्सालविस जोजफ जॉन.
३) श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर.
४) श्री. पाटील अनंत रामचंद्र.
५) श्री. पाटील अशोक बळवंत.
६) श्री. बोर्जीस हेरल जॉर्ज.
७) श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ.
८) श्रीम. शाह रिटा सुभाष.

मा. महापौरांना मी प्रशासनातर्फे विनंती करतो की, निवडून आलेल्या सदस्यांची नांवे घेतो त्याप्रमाणे मा. महापौरांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ३० :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २०(५) नुसार स्थायी समिती आठ सदस्य पदासाठी निवडणूक.

**ठराव क्र. २१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २०(५) नुसार स्थायी समितीचे आठ सदस्यांच्या रिक्त पदासाठी दिनांक १४/०७/२००३ रोजी एकूण १५ सदस्यांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती. परंतु नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या विहित तारखेस व वेळेस आणि निवडणूक प्रक्रिया प्रारंभ होणे अगोदर असे एकूण सात सदस्यांनी आपली नामनिर्देशन पत्रे मागे घेतली. स्थायी समितीची आठ पदे रिक्त असल्याने व उमेदवार आठच शिल्लक राहिल्याने सदरहू आठ सदस्य बिनविरोध निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे. त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

१) आसिफ गुलाब शेख
२) गोन्सालविस जोजफ जॉन
३) नितीन गोपीनाथ ठाकूर
४) पाटील अनंत रामचंद्र
५) पाटील अशोक बळवंत
६) बोर्जीस हेरल जॉर्ज
७) रॉड्रीक्स मॉरस जोसेफ
८) शाह रिटा सुभाष

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपणांस एक विनंती करतो आहे की, जे आठ सदस्य निवृत्त झालेले आहेत. त्यांनी मागच्या वर्षामध्ये प्रशासनाला चांगले सहकार्य केले. ह्या महापालिकेला स्वच्छ, सुंदर, हरित सुंदर मिरा भाईंदर बनविण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशी आपली संस्कृती बोलते की, जे रिटायर्ड होतात त्यांचासुद्धा सत्कार केला पाहिजे. आलेल्यांचा सत्कार तर झालाच पाहिजे. परंतु रिटायर्ड लोकांनी चांगले काम केलेले आहे म्हणून त्यांचासुद्धा सत्कार केला पाहिजे. अशी माझी सुचना आहे. तरी त्यास आपण मान्यता द्यावी.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर मॅडम आता जी नांवे घोषीत झाली त्या सर्व नवनियुक्त सदस्यांचे कॉंग्रेस पक्षातर्फे हार्दिक स्वागत करतो आणि सभागृहाला विनंती करतो की, आता हे जे सोळा सदस्य स्थायी समितीचे होतात तरी सर्वसाधारण नियमाप्रमाणे सात दिवसाच्या आत आपण स्थायी समितीची समिती गठीत करुन त्यांचा सभापती निवडत असतो. तरी ती तारीख आजच्या मिटींगमध्ये घोषित करावी.

**प्र. सचिव :-**

नाही, असे नाही. आता जे स्थायी सदस्य निवृत्त झाले त्यांची मुदत १ ऑगस्ट २००३ पर्यंत आहे. मागच्या वर्षी सप्टेंबरच्या महिन्यात पहिली मिटींग झाली होती. नियमाप्रमाणे त्याच महिन्यात पहिली जी सभा होईल त्या सभेत सभापतीची निवडणूक घेण्यांत येईल अशी तरतुद आहे.

**चंद्रकांत वैती :-**

कृपया ही तरतुद सभागृहासमोर वाचून दाखविण्यांत यावी.

**प्र. सचिव :-**

स्थायी समिती सभापती निवडणूक २१ स्थायी समिती कलम २० पोटकलम (२) अन्वये तिच्या नेमणुकीनंतर तिच्या पहिल्या सभेत किंवा त्यानंतर पुढील वर्षी त्याच महिन्याच्या तिच्या पहिल्या सभेत आपल्या सदस्यांपैकी एकाची सभापती म्हणून नेमणूक केली पाहिजे अशी तरतुद आहे.

मी. सन्मा. नवनिर्वाचित स्थायी सदस्यांची नांवे घेत आहे. तरी त्यांनी डायसवर यायचे आहे आणि मा. महापौरांच्या हस्ते पुष्पगुच्छ स्विकारायचा आहे

१) श्री. आसिफ गुलाब शेख.
२) श्री. घोन्सालविस जोजफ जॉन.
३) श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर.
४) श्री. पाटील अनंत रामचंद्र.
५) श्री. पाटील अशोक बळवंत.

६) श्री. बोर्जीस हेरल जॉर्ज.
७) श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ.
८) श्रीम. शाह रिटा सुभाष.

(मा. महापौरांनी सर्व नवनिर्वाचीत सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व त्यांचे अभिनंदन केले)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मी एक शोक प्रस्ताव दिलेला आहे. तरी मी शोक प्रस्ताव मांडतो आहे की, प्राफेसर श्री. राजेंद्रसिंग ऊर्फ रज्जू भैया हे प्राध्यापक होते. भौतिक शास्त्र या विषयामध्ये सरकारतर्फे त्यांना सुवर्ण पदक देण्यांत आले होते. आपल्या जीवनकाळात नोकरी न करता त्यांनी संपूर्ण आयुष्य देशाच्या व समाजाच्या विकासासाठी अर्पण केले. कै. रज्जू भैया यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते संचालक या पदावर काम केलेले आहे. दि. १४/०७/२००३ रोजी त्यांचे दिर्घ आजाराने दुःखद निधन झाले. तरी या महान आत्म्यास चिरशांती लाभो ही इंश्वरचरणी प्रार्थना. असा मी प्रस्ताव मांडत आहे.

**प्र. सचिव :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी श्रद्धांजलीसाठी जागेवर दोन मिनिटे स्तब्ध उभे रहायचे आहे.

**ठराव क्र. :-**

**शोकप्रस्ताव :-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संचालक श्री. राजेंद्रसिंग ऊर्फ रज्जु भैया ह्यांचे दिर्घ आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना करुन त्यांच्या अकाली निधानामुळे त्यांच्या कुटूंबावर ओढवलेल्या दुःखात ही सभा सहभागी आहे.

**सुचक :- श्री. धनराज अग्रवाल.** **अनुमोदन :- श्री. जयंत पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा.महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. प्र. सचिव अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ**
**दुपारी ३.३० वाजता**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र.सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपलिका**